**प्रेसनोट दिनांक ०३/०३/२०१९**

**खडक पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**<u>वडा-पावच्या हातगाडीवर लागलेली आग तात्काळ विझवुन दुर्घटना टाळली.</u>**

दिनांक २८/०२/२०१९ रोजी खडक पोलीस ठाणेकडील म.पो.ना. ५९९२ शिंदे, पो.शि.लामतुरे व पो.शि.वळवी असे सी.आर. मोबाईलवर दिवसपाळी कर्तव्यावर असताना, 'गोटीराम भैय्या चौक येथील एका वडापावच्या हातगाडीमध्ये असलेल्या स्टोव्हचा भडका होऊन, हातगाडीमध्ये आग लागली असल्याचे' काही नागरिकांनी नमुद कर्मचारी यांना कळविले. सदर माहिती मिळताच वरील नमुद कर्मचारी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन, तेथे उपस्थित असलेल्या ट्रॅफीक पोलीसांच्या मदतीने वडापावच्या हातगाडीवर लागलेली आग विझवली. सदर आगीमध्ये सुदैवाने कोणत्याही प्रकारची जिवीत हानी झालेली नसुन, हातगाडीवरील किरकोळ साहित्याचे नुकसान झालेले आहे. वरील नमुद कर्मचा-यांनी तात्काळ केलेल्या मदतीमुळे मोठी दुर्घटना टाळण्यात आली.

दि.०३/०३/२०१९

**( राजेन्द्र मोकाशी )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
खडक पोलीस ठाणे, पुणे शहर

